# कवी विठ्ठल वाघांच्या काव्यातील देशीयता

***उत्कर्ष प्रविण गायकवाड***
संशोधक विद्यार्थी
श्री. माधवराव पाटील महाविद्यालय, मुरूम
ता. उमरगा जि. उस्मानाबाद

*सारांश :*

*कवी विठ्ठल वाघ सर्व महाराष्ट्राला ग्रामीण कवी, गीतकार म्हणून सर्व परिचित आहेत. त्यांच्या 'काया मातीत मातीत" या गीताने त्यांना अधिक लोकप्रियता मिळवून दिली. आधुनिक काळात कवितांच्या आशय, विषय याबाबतीत बरेच परीवर्तन झाले जागतिकीकरण उदारीकरण, विविध स्पर्धा, झगमगाटी जग कवितेत व्यकत झाले. मात्र विठ्ठल वाघांची कविता ग्रामीण परीसरात अधिक प्रमाणात रममाण झाली. ग्रामीण परीसर निसर्ग, सण –उत्सव, परंपरा, रितीभाती, कृषीजीवन, त्यातील फेरबदल, विविध समस्या, बलुतेदारी पध्दत, संघर्षमय जीवन यांतच अधिक त्यांची कविता एकवटून गेली. नवीन आगळा वेगळा विषय त्यांनी घेतला नाही. त्यामळे त्यांच्या काव्यातील देशीयता' हा विषय लेखनासाठी महत्त्वाचा वाटला. कवीचे लेखन, चिंतन, मनन कसे देशीय स्वरूपाचे आहे हे त्यांच्या काव्यांच्या आधारे सिद्ध करुन शेवटी निष्कर्ष नोंदवले आहेत. 'ज्ञानपीठ पुरस्कार' प्राप्त मराठी साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांचा देशीवाद इतर कवीपेक्षा विठ्ठल वाघांच्या काव्याला पूर्णतः लागू पडतो असे म्हणायला काहीच हरकत नाही*

**प्रस्तावना :**

1960 नंतर मराठी काव्यप्रांतात गाजलेले ग्रामीण कवी म्हणजे विठ्ठल वाघ हे होत. त्यांनी 'काया मातीत मातीत', 'साय', 'वैदर्भी, 'कपाशीचे चंद्रफुले' असे विविध आशयाचे काव्यसंग्रह लिहिलेत. मात्र ग्रामीण परीसराशी असलेली नाळ त्यांनी तुटू दिली नाही. ग्रामीण कविता आणि विठ्ठल वाघ यांचा अन्योन्य संबंध निर्माण झाला. या काळात काव्यगायनाला विशेष महत्त्व असल्याने कवीने गावोगावी जाऊन आपल्या काव्यातून शेतकऱ्यांचे दु:ख व्यक्त केले. त्याचबरोबर समाजप्रबोधन करून शेतकऱ्यांला आपल्या हक्काविषयी जागृत करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र पालथा घातला. कवी विठ्ठल वाघ यांचे काव्य मनाला भिडणारे असल्याने त्यांचा प्रभाव सर्वसामान्यांवर नक्कीच झाला. त्यांनी फक्त काव्यच केले नाही तर प्रत्यक्ष कापसाच्या भावासाठी आंदोलनात सहभाग घेऊन स्वतः तुरूंगवास देखील भोगला. अशाप्रकारे कृती आणि उक्ती यांचा समन्वय म्हणजे ग्रामीण कवी विठ्ठल वाघ होत. त्यांचे काव्य प्रामुख्याने ग्रामीण परीसराचे चित्रण करते. ग्राम हाच त्यांच्या काव्याचा प्रमुख गाभा असल्याने भालचंद्र नेमाडे यांनी मांडलेली देशीयता संकल्पना पूर्णतः यांच्या साहित्याला, काव्याला लागू पडते. आज आधुनिकतेच्या नावावर सगळीकडे परीवर्तनाची लाट आली आहे. घरी जेवणासाठी नसले तरी चालेल मात्र पाहण्यासाठी रंगीत टि.व्ही. हवी. ऑनलाईन सेवा, भ्रमणध्वनी, महागडे कपडे या सर्व गोष्टीला अधिक महत्त्व आले. अशाही काळात कवी विठ्ठल वाघ आपली संस्कृती, आपले जगणे, लोकजीवन, वास्तव समस्या, रितीरिवाज, परंपरा, रूढी, कृषीजीवन काव्यातून व्यक्त करतात. वास्तव परिस्थितीचा वेध घेवून योग्य दिशेने परीवर्तनाची आशा धरतात. जूने

हे टाकाऊ नसून ते सोने पण आहे. हे त्यांनी काव्यातून व्यक्त केले आहे. ते वरवरच्या झगमगाटी जगाने हरवून जात नाही, तर वास्तव परीस्थितीतील वाईट परंपरेवर आघात करतात. सुभाषितातून जीवनाचे तत्वज्ञान मांडतात. वऱ्हाडी बोलीतून भाषेतील गोडवा सर्वांना चाखायला देतात. येथे विठ्ठल वाघांच्या काव्यातील देशीयता स्पष्ट करण्यापूर्वी प्रथमतः 'देशीयता' ही संकल्पना येथे स्पष्ट रूपात मांडणे गरजेचे वाटते.

**देशीयता संकल्पना :**

ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त 'मराठी साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांनी 'देशीयता' या संकल्पनेला एक स्वयंभू मूल्य देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते “देशी असणे म्हणजे या एकदंर भूमित्वाचे भान, त्यातील सर्व जाती, वंशाचे समूह, संप्रदाय, धर्म, परंपरा, स्थलकालाचे उभे आडवे छेद या सर्वांसकट येणारे एकजिनसीपणाचे भान होय.”[1] अशी व्याख्या केली आहे. जागतिकीकरणाला प्रत्युत्तर देण्यासाठी देशीवादाचा पुरस्कार प्रभावीपणे उपयुक्त ठरू शकतो. असा आशावाद त्यांनी या संकल्पनेतून मांडला. पाश्चात्य देशातील प्रत्येक विचार, कृती, वस्तू प्रमाण मानने चुकीचे असून आपल्या स्वतःचे स्वतःच प्रमाण असणे गरजेचे आहे. जागतिकीकरण अटळ आहे. मात्र त्यांची भयावह वाईट परीणाम देशीयतेच्या ढालेवर नक्कीच काही प्रमाणात अडविता येतील असे त्यांना वाटते. देशीयतेतील एकजिनसीपणाचे भान कवी विठ्ठल वाघ यांच्या काव्यात आढळून येते. त्यांनी जागतिकीकरण, उदारीकरण यांचे भयावह चित्रण काही प्रमाणात मांडले असले तरी देशीयता, कृषीजीवन, ग्रामपरीसर, धर्म परंपरा, स्थळकाळाचे उभे आडवे छेद व्यक्त केले आहे. आपली संस्कृती ही टाकाऊ नसून ती टिकाऊ आहे असे भान ते काव्यातून व्यक्त करतात. शेतकरी जगाचा पोशिंदा आहे. त्यांच्यामध्ये जग जगविण्याची उमेद आहे. परंपरा, एकता, संस्कृतीचे भान ठेऊन तो समाजात वावरतो आणि हे सर्व देशियता या संकल्पनेला धरूनच आहे.

चंगळवाद, बाजारीकरण आणि वस्तूकरण या तिन्ही प्रकियाचा अटळ परिपाक होऊन मूल्यांचा ऱ्हास होत आहे. शहरी भागात हा मूल्यांचा ऱ्हास अधिक प्रमाणात आहेत. यामानाने अजून ही ग्रामीण भागात खेड्यांच्या वस्तीवस्तीत निष्ठा, त्याग, प्रेम, बंधुता, आपुलकी मानवता जिवंत रूपात असून संस्कृती, विवाह, कुटूंब, संयुक्त समाज अस्तित्वात आहे. त्यांचे स्वरूप कवीने विविध कवितेच्या माध्यमातून चित्रित केले आहे. मग ते शेत असो, खेडे असो की त्या खेडयातील संघर्षमय जीणे असो या सर्वांचा आढावा त्यांच्या काव्यात आला आहे. स्त्री रूपाचे उत्कट चित्रण, वऱ्हाडी बोलीचा साज, जीवनाचे तत्वज्ञान, राजकारण व समाजकारण, लोकपरंपरा जागोजागी कवितेत प्रत्ययास येते. विठ्ठल वाघांची कविता ग्राम संस्कृतीच्या परिवर्तनाचा आलेख मांडणारी आहे. एकीकडे देश विकासाच्या मार्गावर अग्रेसर होत असतांना ग्रामीण परिसर मात्र, अनेक समस्यांनी, उणीवांनी भरून पडला आहे. शेतकऱ्यांचा शेतीमातीशी कायम ऋणानुबंध आहे. शेती, माती, निसर्ग, झाडेझुडपे, पशुपक्षी, जनावरे प्राणी तर यात आहेत. शेतकरी यांच्या वेदना, संघर्ष पराभव, दु:ख, हर्ष अवकाळी स्थिती या कवितेतून समर्थपणे व्यक्त झाली आहे. ग्रामीण रितीभाती, सण, उत्सव, जत्रा, देवळे, वारी, अशा ग्रामसंस्कृतीच्या अनेक घटकांचे वर्णन त्यांच्या काव्यात आले आहे.

कवी विठ्ठल वाघ यांनी खेडयातील भेदक वास्तव आपल्या काव्यात टिपले आहे. सूक्ष्म व उत्कट चित्रण त्यांच्या काव्यात येत असल्याने

त्यांची कविता अस्सल ग्रामीण कविता ठरते. येथे त्यांच्या काव्यातील 'देशीयता' स्पष्ट करणे महत्त्वाचे वाटते ते खालीलप्रमाणे :-

**ग्रामीण जीवनातील विविध दर्शने :**

**खेडयातील दैनंदिन जीवन :**

शेतकरी जगाचा पोशिंदा आहे. तो नित्यनियमित अपार कष्ट उपसून धान्याच्या राशी निर्माण करतो. मात्र त्यांचे जगणे आजच्या काळात अत्यंत खडतर असे बनले आहे. त्यांच्या कष्टाला काळ-वेळ यांचे बंधन नसते. सूर्योदयापूर्वीपासून रात्र होईतो पर्यंत तो अविरत घाम गाळून आपल्या संसाराचा व जगाचा गाडा रेटत असतो. त्यांचे अविरत श्रम हेच त्यांचे जगणे होऊन बसते. दोन वेळचे अन्न, आसरा, अंग झाकायला कपडे आणि आपल्या कुटूंबाची सुखरूपता एवढे सुध्दा त्यांच्या नशिबी नसते. म्हणूनच कवी विठ्ठल वाघ "कपाशीचे चंद्रफुले'या काव्यसंग्रहातील कवितेत म्हणतात.

"कर्जपाणी फिटायचं उरल्याचं तेलमीठ
जाय वर्षावर पुन्हा नव्या लुगडयाची गोठ"

('कपाशीचे चंद्रफुले' काव्यसंग्रह पृ.क. 20)

शेतकऱ्यांच्या कुटूंबियांच्या किमान अपेक्षा एवढयातरी पूर्ण होतील की नाही असा प्रश्न कवीला पडतो. कवीची कविता शेती, शेतकरी आणि त्याचं कुटूंब या आसाभोवती फिरते. त्यांची तिफन' ही अतिशय गाजलेली कविता शेतकऱ्यांची कष्टाची आरती वाटते. कवितेत वेदनेने कासावीस होणारा, रक्ताची आहुती देणारा शेतकरी हिरवं स्वप्न पाहण्याचा आशावाद सोडत नाही. म्हणून कवी 'तिफन' या कवितेत म्हणतो-

पानी भिजलं ढेकूल लोनी पायाले वाटते
काया ढेकलात डोया हिर्व सपन पाहेते

('कपाशीचे चंद्रफुले' तिफन, पृ.क. 37)

त्याची किती कष्ट उपसण्याची तयारी असून फक्त श्रमाचे चीज व्हावे, अशी आशा त्याला नक्कीच लागली आहे. 'वावर', 'ढगामूचूक अभाय','पानी', 'गाव', 'खापराचे दिवे, 'आजून' अशा विविध कविता मधून शेतकऱ्यांचे जीणे, त्याचे कष्ट, त्यांच्या समस्या, त्याचे कुटूंब त्यांच्यातील प्रेम अधोरेखित केले आहे. कवी विठ्ठल वाघांच्या कवितेतील महत्त्वाचा विशेष म्हणजे ग्रामीणत्व त्यांनी आजवरच्या ज्या काही कविता लिहील्या त्या केवळ ग्रामीणच डॉ. अक्षयकुमार काळे यांच्या मते "ग्रामीण निसर्गाइतके किंबहूना थोडे जास्तच ग्रामीण वास्तवाचे भान वाघांना आहे"[2] ही प्रतिकिया योग्यच म्हणावी लागेल. विठ्ठल वाघ यांचा 'वैदर्भी' काव्यसंग्रह वैदर्भीय राहणीमानाचे, जीवनाचे चित्र रेखाटते. 'वृषभसूक्त' काव्यसंग्रहातून बैलांविषयीची कृतज्ञता व्यक्त केली आहे. तर 'गावशिव' व पंढरीच्या वाटेवर या काव्यसंग्रहातून ग्रामसंस्कृती, ग्रामदेवता, पंढरीची वारी, साध्याभोळा वारकरी व्यक्त झाला आहे. तर 'पाऊसपाणी' काव्यसंग्रहात पावसाचे शेतकऱ्यांच्या दृष्टीने असलेले महत्त्व स्पष्ट केले आहे. कधी पाऊस जीवनाचा आधार बनतो तर कधी तोच पाऊस कमी जास्त प्रमाणात येऊन शेतकऱ्यांच्या जीवनात संकटाचे पहाड उभे करतो. या सर्वाचा उल्लेख 'पाऊसपाणी' काव्यसंग्रहात कवी करतात. एकूणच त्यांच्या सर्वच काव्यसंग्रहात ग्रामजीवन व कृषिव्यवसाय याची इत्यंभूत माहिती आली असून त्यातून शेतकऱ्यांचे दैनंदिन जीवन व्यक्त झाले आहे.

**ग्रामीण भागातील समाजकारण व राजकारण :**

विठ्ठल वाघ निसर्गात रममाण होणारे कवी असले तरी समाजाचेही त्यांना भान आहे. आपल्या कवितेतून ते ग्रामीण भागातील गरीब-श्रीमंत, पीडीत-

शोषीत, सामान्य-राजकारणी, शासन-प्रशासन या सर्वांचा त्यांची कविता वेध घेते. आज समाजातील माणूसकी फार लयाला जात असल्याचे ते स्पष्ट करतात. स्वातंत्र्योत्तर काळात सर्व वस्तूचे भाव दुपटी-चौपटीने वाढले मात्र शेतकऱ्यांच्या मालाचा साधा लागवड खर्च सुध्दा निघत नसल्याचे कवी काव्यातून स्पष्ट करतात.

उन्हातून आमी निघालो, आजून सावली नाही
बाभुईच्या आलो बनात, काटेच सावली नाही

( आजून, पृ.क. 30)

शेतकऱ्याला कधी सुखाचे दिवस येतील याबद्दल कवी मन साशंक आहे. ग्रामीण भागातील राजकारण इरेस पेटलेले दिसून येते. ग्रामपंचायतची निवडणूक असो वा सोसायटीची मतभेद वाढत जाऊन माणूस माणसापासून दुरावत चालल्याचे दु:ख कवीला आहे. राजकारणी लोक आपल्या स्वार्थापोटी सर्वसामान्यांचे बेहाल करीत आहे. म्हणून आपल्या मिळालेला मतदानाचा अधिकार जाणिवपूर्वक बजावून समाजात परीवर्तन घडवून आणले पाहीजे. तसेच आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरूध्द जोरकसपणे आवाज उठविला पाहीजे असे कवी सुचवितात.

आरे बदला पुट्टे बदला चाळ मातर फिरतं ठेवा
धुरकरी व्हा कोणी राजा गाळं मातर चालत ठेवा

(रगता भांबय..पृ.क.29)

अशी कवीला योग्य दिशेने परीवर्तनाची आस अपेक्षित आहे, असे लक्षात येते. राजकारण व समाजकारण हितासाठी झाले पाहिजे असे त्यांना वाटते. कवी मनाला समाजमन नीट कळले,समजले असल्याने त्यांनी आपल्या सामाजिक कवितेत ते यथार्थपणे शब्दबध्द करू शकले, असे म्हणता येईल. महाराष्ट्रातील शेतकरी संघटनांच्या आंदोलनात त्यांनी हिरीरीने घेतलेला सहभाग त्यांची समाजाभिमुखता स्पष्ट करते. त्यांच्या काही कवितेत सामाजिक व राजकीय वास्तवाचे प्रखर चित्रण आलेले आहे. तसेच त्याचा निषेध ही व्यक्त झाला असल्याचे लक्षात येते एकूणच शेतकरी जीवनाचे सगळे संदर्भ त्यांच्या काव्यात आलेले आहेत.

**वऱ्हाड बोलीचा साज :**

कवी विठ्ठल वाघांनी आपल्या संपूर्ण कविता वऱ्हाडी बोलीतून लिहिल्या आहेत. वऱ्हाडी बोलीतील जोमदारपणा, रांगडेपणा व तिच्यात असलेली नादाकुलता त्यांच्या कवितेत ओतप्रोत भरलेली आहे. त्यांच्या वऱ्हाडी बोलीचा बाज विषयी प्रा. चंदकुमार नलगे म्हणतात, "विद्ठल वाघ (साय) आणि शंकर बढे (इरवा) यांच्या कवितेत ग्रामीण बोलीचा बाज जीवनानुभवाला अस्सलतेचे परिमाण प्राप्त करून देणारा ठरला"* एकूणच वऱ्हाडी बोलीतील विठ्ठल वाघांचे काव्य दर्जेदार व जीवनानुभवी बनले आहे. त्यांची कविता वऱ्हाडी बोलीतून ग्रामीण माणसांच्या जगण्याचा वेध घेते. त्यांच्या काव्याबाबत रेखा जगदाळे आपल्या समिक्षात्मक ग्रंथात म्हणतात. "बोली भाषेतील शब्द, म्हणी, वाक्प्रचार यांचा वापर ते कवितेतून करतात, त्यामुळे वाघांच्या कवितेच्या रूपाने ग्रामीण कवितेचे एक नवे रूप आपल्याला पाहावयास मिळते. त्यांची कविता म्हणजे लोकानुभवाला, लोकभाषा, लोकजीवन, लोकसंस्कृती, लोकगीत यांच्या अंगाने आविष्कृत करणारी लोककविता आहे." वऱ्हाडी बोलीतील असलेल्या त्यांच्या कवितेचे विषयी असलेले वरील मत यथोचित वाटते.

"अखाळीले जारे तुमी माहा वावर पंढरी
हाले भळाच्या पानात झेंडी इठोबाची खरी

(वावर पृ.क.02)

वरील 'वावर' कवितेतील कडव्यात माहा, अखाळी, भळ, तुमी, इठोबा अशाप्रकारची शब्द वऱ्हाडी बोली प्रकर्षाने दर्शविते तुम्हाला, आम्हाला किंवा तुला, मला यांची वरील कवितेत वऱ्हाडी रूपे तुले, मले तुमी अशी होतात. विठोबाच्या 'वि' ऐवजी 'ई' अक्षराचा वापर होतो, असे दिसून येते. एकूणच वऱ्हाडी बोली वाचकाचे लक्ष वेधून घेते.

**ग्रामीण काव्यातून जीवनाचे तत्त्वज्ञान :**

कवी विठ्ठल वाघ यांच्या सुरवातीच्या 'साय' 'वैदर्भी' 'काया मातीत मातीत' या काव्यसंग्रहात सुभाषित सदृश्य रचना असलेले मुक्तके आली आहेत. सुभाषितातून (मुक्तकातून) कवीने जीवनाचे तत्त्वज्ञान उलगडले आहे. मानवी स्वभाव, संगतीचा परीणाम, अहंकारी व्यक्तीची दुर्दशा प्रयत्नाचे फळ, नात्यासंबंधीची जवळीकता, दुरावा व्यक्त करून समाजाला दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. उदाहरणादाखल 'साय' 'वैदर्भी' काव्यसंग्रहातील मुक्तकांचा येथे विचार करता येईल.

भेला कष्टाले माणूस
होते महाग ताकाले
वाट तपोल्या बिगर
नाही बसत चाकाले

('साय' काव्यसंग्रह पृ.क्. 37 )

येथे संत तुकारामाच्या, संत रामदासाच्या प्रयत्नवादाच्या विचारांची आठवण आल्याशिवाय राहत नाही. अवघ्या चार ओळीच्या मुक्तकातून प्रभावी असा विचार कवी देतात. तसेच

नागपंचमीच्या रोजी दुध सर्पाले पाजावं
पण दोगल्या माणूस दारी उभा ना करावं

(वैदर्भी काव्यसंग्रह पृ.क्र. 03 )

येथे परक्या, परपुरूषाला त्यातल्या त्यात दोन्ही बाजूने बोलणार्या (दुतोंड्या) व्यक्तिला घरासमोर देखील उभे करू नये. कारण-अशी माणसे हिताची नसतात, असे कवी आपल्या मुक्तकातून आवर्जून सांगतो. मुक्तके सुभाषितासारखी असून जीवनाचे त्वज्ञान मांडतात. हे वाघांच्या कवितेचे विशेष म्हणावे लागेल.

**ग्रामीण लोकजीवन, लोकपरंपरा, लोकसंस्कृती (सण, उत्सव) :**

कवी विठ्ठल वाघांच्या कवितेचे आगळेपण म्हणजे त्यांनी आपल्या कवितेतून लोकजीवन, लोकपरंपरा, लोकसंस्कृती जपण्याचे काम केले आहे. ग्रामातील शेतकरी जीणं, सण, उत्सव साजरे करण्याची प्रथा, परंपरा, रितीरीवाज तपशिलवारपणे त्यांच्या कवितेत आले आहे. 'काया मातीत मातीत' काव्यसंग्रहात माळीभोळणी, दिवाळी दसरा, कार्तिक महिन्याचा उल्लेख तसेच लोकजीवनातील भावभावना-कल्पना, संकेताने समजून घेण्याचा प्रघात त्यांच्या काव्यात आला आहे. त्यांच्या मनावर लोककलांचा कळत-नकळत संस्कार झालेला असल्याने त्यांच्या कवितेतून लोकतत्त्वाचा पायरव ऐकू येतो. लोकगीताचा भरणा, औचित्यपूर्ण शब्दयोजना, नादाकुलता, लयबध्दता त्यांच्या काव्यात आहे. परंपरागत जीवनमूल्ये, जीवनविषयक त्वज्ञानात समाजाला दिशा देण्याचे काम येथे झाले आहे. लोकजीवनातील राघू-मैना जोडी, भुलाईचे गाणे, उचकी लागणे, चिळी-भोरी, कवठाचा वास येणे, हिरवाकंच चुळा, या सर्वातून लोकपरंपरा, लोकगीत, समजूतीचा सुगंध दरवळत राहतो. लोकगीतातील लयबध्दता, नादमयता

प्रासाचा प्रभाव, औचित्यपूर्ण शब्दयोजना, गतिमानता, त्यांच्या काव्यात जागोजागी प्रत्ययास येते.

**सद्‌यकाळात देशीयतेची गरज :**

आधुनिक काळात जागतिकीकरण, खाजगीकरण याने सर्व जग ढवळून निघाले. इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्रावर देखील त्यांचा परीणाम झाला. भौतिक राहणीमान सुधारले, निम्माहून अधिक लोक शहरी भागात जाऊन आपल्या मुलांना कॉन्व्हेटचे शिक्षण देऊ लागले. ग्रामीण परीसरातील संयुक्त कुटूंबपध्दती विस्कळीत होऊन एकल कुटूंबपध्दती जोर धरू लागली. त्यातून स्वार्थी प्रवृत्ती बळावली. जागतिकीकरणाच्या या प्रकियेचे सामाजिक आणि सांस्कृतिक परिणाम भयावह होऊ लागले. गरीब-श्रीमंती यांची दरी वाढून चंगळवादाची वृत्ती समाजात निर्माण झाली. सगळयाच गोष्टीचे बाजारीकरण होऊन बाजारातील शोभेच्या वस्तू बनल्या. मानसिकता बदलून प्रत्यक्ष आचार-विचार अवतरू लागली आणि माणूस माणसापासून दुरावत जाऊन एकलकोंडा बनला. त्यांच्यात केवळ स्वार्थ शिल्लक राहिला. अशाकाळात देशीयता असणे गरजेचे वाटते. ग्रामीण भागातील पूर्वीचा आपुलकीपणा, जिव्हाळा, प्रेम, बलुतेदारी पध्दत, समता, एकता, सद्य काळात महत्वाची वाटत आहे. जीवनाचे तत्वज्ञान सांगणाऱ्या लोककला, लोकपरंपरा, सण उत्सव यांची व्यक्तिच्या जीवनात गरज असल्याचे जाणवते. केवळ पाश्चात्य संस्कृतीच्या मागे न जाता आपली संस्कृती सुध्दा उत्कृष्ट असल्याचे भान सर्वामध्ये येणे गरजेचे आहे. असे न झाल्यास त्यांचे वाईट पडसाद आपल्याला पुढच्या काळात अधिकाधिकच जाणवतील. जागतिकीकरण व्यक्तीच्या प्रगतीसाठी, सुखसमृध्दीसाठी महत्वाचे असले तरी आपण देशीयतेचे भान विसरून चालणार नाही. देशियतेचे महत्व आपण समजून घेणे गरजेचे आहे. आपली संस्कृती, संत साहित्य, आपले तत्वज्ञान आपल्या प्रगतीचा टप्पा आहे, त्याला विसरून चालत नाही.

**निष्कर्ष :**

1. कवी विठ्ठल वाघ यांचे आधुनिक मराठी काव्यप्रवाहात स्वतंत्र असे स्थान असून त्यांची कविता वास्तवतेचे भान राखून आहे.
2. त्यांची कविता ग्रामीण मातीशी, संस्कृतीशी, परंपराशी नातं सांगणारी असून भविष्याची चिंता वाहणारी आहे.
3. डॉ. भालचंद्र नेमाडे यांची देशीवादाची संकल्पना व विठ्ठल वाघाची कविता निकटचा संबंध दर्शविणारी आहे. त्यांच्या काव्यातून देशीवादाचा पुरस्कार आहे.
4. गावातील एकसंघपणा, विविध परंपरा, रितीरिवाज, सण उत्सव, लोकसमाज लोकसंस्कृती देशीवादाला पूरक आहेत.
5. कविला परिवर्तनाची आस असली तरी जुन्या परंपरा, विचार, तत्वज्ञान, संस्कृती याला त्यांचा विरोध नाही. तर त्याच्याविषयी, त्यांच्या मनात आदरभाव आहे.

**संदर्भ :**

1. नेमाडे भालचंद्र - टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद द्.आ. 2001,पृ.क्र. 114

VOL- VIII ISSUE- X OCTOBER 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

2. काळे अक्षयकुमार - अर्वाचीन मराठी काव्यदर्शन, पां.ना.बनहष्टी प्रकाशन,नागपूर प्र.आ. 1999, पृ.क. 601
3. नलगे चंद्रकुमार - ग्रामीण वाड्मयाचा इतिहास, प्रकाशक-गुलाबराव माकारले सुरेश एजन्सी 250, पुणे-02 प्र.आ. 1996, पृ.क. 126
4. जगदाळे रेखा -प्रादेशिक ग्रामीण साहित्य समिक्षेची समीक्षा, विजय प्रकाशन, नागपूर प्र.आ. 2006, पृ.क. 218